महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
web: www.dhepune.gov.in E-mail: dhepune@yahoo.co.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/अहिंदी/नमं/२०१६-१७/१४अई 10622 दि. 27 JUN 2016

परिपत्रक :-

प्रति,

१. कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे.
२. विभागीय शिक्षण सहसंचालक,उच्च शिक्षण,
सर्व विभाग

विषय : अहिंदी भाषिक राज्यातील अहिंदी भाषिक विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेत्तर अभ्यासक्रमासाठी देण्यात येणारी हिंदी शिष्यवृत्ती.
नवीन मंजूरी/नूतनीकरण सन २०१६-१७.

अहिंदी भाषिक राज्यातील हिंदीचा अभ्यास करणा-या अहिंदी भाषिक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून हिंदी शिष्यवृत्ती योजना असून सदर शिष्यवृत्ती या संचालनालयाच्या स्तरावरुन मंजूर केली जाते. सन २०१६-१७ या वर्षाकरिता अहिंदी भाषिक विद्यार्थ्यांनाकडून हिंदी शिष्यवृत्तीसाठी आवेदनपत्रे भरुन या संचालनालयास पाठविण्यात यावीत. आवेदनपत्रामध्ये खालील अटीची पूर्तता करण्यात यावी.

१. विद्यार्थ्यांची मातृभाषा हिंदी नसावी.

२. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा मूळचा रहिवासी असावा.

३. विद्यार्थ्यांने ज्या शाखेत प्रवेश घेतला असेल तो रुजू अहवाल आवश्यक असून त्यामध्ये विद्यार्थ्यांने हिंदी विषय घेणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थ्यांला इ.१०वी/इ.१२/ वीमध्ये ६० टक्के पेक्षा जास्त गुण व हिंदी विषयात किमान ६५ टक्के पेक्षा जास्त गुण असणा-याचेच आवेदनपत्रे पाठवावेत.

५. इ.११वीच्या शिष्यवृत्तीकरिता इ.१० वी मार्च २०१६ ची साक्षांकित केलेली गुणपत्रिका व बी.ए.प्रथम वर्षाच्या शिष्यवृत्तीकरिता इ.१२ वी मार्च २०१६ ची सांक्षांकित केलेली गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे.

६. एम.ए.प्रथम वर्षाच्या शिष्यवृत्तीकरिता बी.ए.तृतीय वर्ष परीक्षेच्या साक्षांकित केलेली गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे.

७. अर्ज परिपूर्ण व बिनचूक भरलेला आवश्यक आहे. अपूर्ण अर्जाचा व विहित मुदतीत न आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

८. नुतनीकरणाचा प्रस्ताव पाठवितांना विद्यार्थ्यांला मागील वर्षाच्या अंतिम परीक्षेत किमान ५० टक्के पेक्षा जास्त गुण आवश्यक आहे व विद्यार्थ्यांने हिंदी विषय घेतलेला असवा. तसेच वार्षिक प्रगती अहवालामध्ये गतवर्षीमध्ये नुतनीकरणाचा फोलिओ क्रमांक व आदेश क्रमांक, दिनांक नमूद करणे आवश्यक आहे. नविन मंजूरीकरिता नविन मंजूरीचाच अर्ज व नुतनीकरणकरिता वार्षिक प्रगती अहवाल भरणे आवश्यक आहे.

हिंदी शिष्यवृत्तीसाठी एकूण २५५ संच मंजूर असून संचाच्या अधीन राहून गुणवत्तेनुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या अर्जात उणीवा आढळून आल्यास व उणीवांची पूर्तता त्याच आर्थिक वर्षात न केल्यास अर्ज अपात्र समजण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांवर राहील यांची कृपया नोंद घ्यावी. तसेच सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना इतर शिष्यवृत्ती मंजूर झालेली नसेल याची खात्री करण्यात यावी. कारण प्रचलित नियमानुसार एका वेळी एकच शिष्यवृत्तीचा लाभ घेता येतो.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत बँक खाते उघडणे बंधनकारक असून, विद्यार्थ्यांनी त्याचा सद्याचा स्वतःचा सुरु असलेला खाते क्रमांक, बँकेचा संपूर्ण पत्ता, बँक शाखा कोड नंबर आयएफएससी कोड आधार कार्ड क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक, इत्यादी माहिती बिनचूकपणे अर्जात नमूद करावी. तसेच विद्यार्थ्यांने बँक खातेच्या पासबुकाची पहिल्या व शेवटच्या पानाची झेरॉक्स अर्जासोबत जोडणे अत्यंत आवश्यक आहे.

संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी हिंदी शिष्यवृत्तीचे आवेदनपत्रे अचूक व परिपूर्ण भरुन या संचालनालयात दि.३०.०९.२०१६ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावेत. अपूर्ण व चुकीची माहिती असलेली आवेदनपत्रे तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त झालेली आवेदनपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत अशा स्पष्ट सूचना महाविद्यालयांना देण्यात याव्यात. दि.३०.९.२०१६ नंतर प्राप्त झालेले नविन मंजूरी/नुतनीकरणाचे प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

उपरोक्त सुचना आपल्या स्तरावर सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे कळवून अहिंदी भाषिक राज्यातील अहिंदी भाषिक विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या हिंदी शिष्यवृत्ती या योजनेचे आवेदनपत्रे विहीत मुदतीत या संचालनालयास पाठविणेबाबत, कळविण्यात यावे.

(डॉ. वि. रा. मोरे)
शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१